दिनांक :

प्रति,

**मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

**मा. केंद्रीय गृहमंत्री, भारत शासन, देहली.**

**विषय : गोरक्षक श्री. चेतन शर्मा, श्री. विकास गोमसाळे आणि श्री. मयूर विभांडीक यांच्यावर प्राणघातक आक्रमण करणाऱ्या धर्मांधांवर कठोर कारवाई करणे, तसेच अवैध पशूवधगृहे बंद करणे यांविषयी.....**

महोदय,

महाराष्ट्र शासनाने वर्ष २०१५ मध्ये सत्तेत आल्यानंतर शीघ्रतेने गोवंश हत्याबंदीचा कायदा केला. या कायद्यामुळे गोवंश हत्या आणि गोतस्करी बंद होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात असे झालेले दिसत नाही. याउलट गोरक्षकांवर आक्रमणे वाढत आहेत. ही अतिशय चिंतेची गोष्ट असून गोमातेच्या रक्षणासाठी प्राणपणाला लावणाऱ्या गोरक्षकांच्या प्राणावर बेतलेले पुढील प्रसंग नक्कीच दुर्दैवी आहेत. वाणगीदाखल केवळ दोनच प्रसंगांचा येथे उल्लेख करत आहोत.

**१. श्री. चेतन शर्मा यांच्यावर ३५० हून अधिक धर्मांध कसायांच्या जमावाने केलेले प्राणघातक आक्रमण :** दिनांक २४ जून २०१९ च्या रात्री बदलापूर, ठाणे येथील गोरक्षक श्री. चेतन शर्मा (सदस्य, 'पीपल्स फॉर ॲनिमल अ‍ॅण्ड ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया') ३५ हून अधिक पोलिसांना घेऊन अवैध पशूवधगृहाच्या विरोधात कारवाई करण्यासाठी गेले होते. त्या वेळी त्यांच्यावर ३५० हून अधिक धर्मांध कसायांच्या जमावाने प्राणघातक आक्रमण केले. यात ते गंभीररित्या घायाळ झाले असून रूग्णालयात अतीदक्षता विभागात आहेत.

गोरक्षक चेतन शर्मा पोलिसांसमवेत गेले असतांना धर्मांध कसायांनी त्यांच्या डोक्यात लोखंडी सळई मारली; मात्र त्याही अवस्थेत त्यांनी प्रसंगावधान राखत स्वरक्षणार्थ असलेल्या स्वतःकडील पिस्तुलातून हवेत गोळीबार केला. त्यामुळे कसाई मागे हटले. श्री. चेतन यांच्यावर यापूर्वीही धर्मांधांनी अनेकदा प्राणघातक आक्रमणे केली होती; पण ते त्यातून सुखरूप वाचले. वरील घटना घडत असतांना धर्मांधांनी पोलिसांवरही आक्रमण केले. या आक्रमणात पोलिसांच्या वाहनाच्या काचा फुटल्या, तसेच श्री. शर्मा यांचा बचाव करतांना पोलिसांनाही दुखापत झाल्याचे समजते.

इतक्या मोठ्या संख्येत पोलीस असतांनाही एखाद्या व्यक्तीवर आक्रमण करण्याचे धाडस कसायांना होते, तसेच पोलिसांवर हात उचलण्याची आणि त्यांच्या गाड्या फोडण्याची हिंमत कसायांमध्ये येते, यातून कसायांना कोणाची भीती राहिलेली नाही, हेच दिसून येते.

**२. श्री. विकास गोमसाळे आणि श्री. मयूर विभांडिक या गोरक्षकांवर केलेले प्राणघातक आक्रमण :** दिनांक १८ जून २०१९ च्या रात्री ९ वाजता श्री. विकास गोमसाळे आणि श्री. मयूर विभांडिक या गोरक्षकांची रिक्शा वडजाई रोड येथून जात असतांना अमजद मुल्ला याच्या मुलाने गावठी पिस्तूल डोक्याला लावून रिक्शा थांबवली. त्यानंतर ८० हून अधिक धर्मांधांनी त्यांच्यावर प्राणघातक आक्रमण केले. या वेळी 'गोमांस का धंदा चौपट हो रहा है, इनको खत्म कर दो', असे म्हणत या दोघांना पुष्कळ मारहाण केली. त्यात ते गंभीर घायाळ आहेत. त्यांच्या हातातील सोन्याच्या अंगठ्या, गळ्यातील साखळी, खिशातील रोख रक्कम, भ्रमणभाष आदी साहित्य धर्मांधांनी बळजोरीने हिसकावून घेतले.

३. यापूर्वीही मालेगाव (नाशिक, महाराष्ट्र) येथील गोरक्षक श्री. मच्छिंद्र शिर्के यांच्यावरही प्राणघातक आक्रमण करण्यात आले.

४. दिनांक ९.११.२०१५ या दिवशी मूडबिद्री (कर्नाटक) येथे गोरक्षक प्रशांत पुजारी यांची धर्मांधांनी हत्या केली.

५. विद्यमान कायद्यात शिक्षेसाठी कठोर तरतुदी नसल्याने बहुतांश प्रकरणांतील आरोपींना तत्काळ जामीन मिळतो आणि ते पुढेही अशाच कायदाबाह्य कृती पुन्हा चालू ठेवतात. कायद्याचा धाक गोहत्या करणारे आणि गोतस्कर यांना अजिबात राहिलेला नाही, हेच यातून स्पष्ट होते. गोवंशाचे रक्षण करण्यासाठी पोलिसांना साहाय्य करण्यासाठी गोरक्षक सदैव तत्पर असतात. त्यामुळे गोरक्षण करणाऱ्यांचे रक्षण करणे, हे पोलिसांचे कर्तव्य आहे.

६. देशात हिंदुबहुलता आणि गोहत्या प्रतिबंधक कायदा असूनही गोमातांची हत्या अन् गोमांसाचा व्यापार आजही प्रशासनाला रोखता आलेला नाही. वर्ष १९४७ मध्ये ९० कोटी असलेले देशी गोधन आता अवघे २-३ कोटी उरले आहे, तर १२८ गायींच्या देशी जातींपैकी केवळ १८ जाती शेष आहेत. आजही गोमातांच्या रक्षणासाठी सध्या गोरक्षक प्राणावर उदार होऊन प्रयत्न करत आहेत. अनेकदा गोहत्या करणारे कसाई हे अनधिकृत शस्त्रास्त्रांसह गोरक्षकांवर आक्रमणे करतात, हे कायदा-सुव्यवस्था अबाधित नसल्याचे लक्षण म्हणता येईल.

**⁕ तरी याविषयी आमच्या पुढील मागण्या आहेत –**

१. गोरक्षक सर्वश्री. चेतन शर्मा, श्री. विकास गोमसाळे आणि श्री. मयूर विभांडीक यांच्यावर आक्रमण करणाऱ्या धर्मांधांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

२. देशभरात अनेक गोरक्षकांवर झालेल्या आक्रमणांच्या प्रकरणी शासनाने विशेष तपास पथक स्थापन करावे आणि या प्रकरणातील सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी.

३. देशभरातील अवैध पशूवधगृहे तत्काळ बंद करण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत.

४. देशभरात गोवंश हत्याबंदी कायदा तात्काळ लागू करावा आणि त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी.

५. ज्या राज्यांत गोवंश हत्याबंदी कायदा लागू आहे, त्या कायद्यातील शिक्षा अधिक कठोर करण्यात याव्यात, तसेच गोमातांच्या रक्षणासाठी जीव धोक्यात घालणाऱ्या गोरक्षकांना कायद्याचे साहाय्यक म्हणून नेमणूक करावी.

आपला विश्वासू,

संपर्क :